डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
दापोली-४१५ ७१२ जिल्हा-रत्नागिरी

जा.क्र.डॉ.बासाकोकृवि / बांधकाम / अे—७/ 683 / २०१७ 2847 दिनांक : 18 APR 2017

# ई निविदा सूचना

19 APR 2017

विद्यापीठ अभियंता, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी यांचेकडून अधिकृत उत्पादक, अधिकृत पुरवठादार किंवा अधिकृत विक्रेत्यांकडून खालील कामासाठी ''ड'' नमुन्यामध्ये (व्दि लखोटा पध्द्त) ई निविदा प्रणालीव्दारे (ऑन लाईन) निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित रक्कम | इसारा बयाणा रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी | प्रत्येक ई—निविदा संचाची रक्कम ना परतावा | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठांतर्गत सर विश्वेश्वरय्या सभागृहासाठी साऊंड सिस्टीम, एल.इ.डी. स्क्रीन आणि ॲक्वास्टिक साहित्य पुरविणे, दापोली, जि.रत्नागिरी | २५,९८,४१९/— | २६,०००/— | पंधरा दिवस | १,०००/— | अधिकृत उत्पादक, अधिकृत पुरवठादार किंवा अधिकृत विक्रेते |

## ई—निविदेचे वेळापत्रक

| अ. क्र. | डॉ.बा.सा.कोंकण कृषि विद्यापीठाकडील कार्यवाही | कंत्राटदार / ठेकेदाराकडील कार्यवाही | दिनांक व वेळ पासून | दिनांक व वेळ पर्यंत | लखोट्याबाबत शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | ई—निविदा प्रसिध्दी | --- | २०.०४.२०१७ वेळ १०.०० | — | --- |
| २. | --- | ई—निविदा डाउनलोड करणे | २०.०४.२०१७ वेळ १०.०० | ०४.०५.२०१७ वेळ १७.३० | तांत्रिक व आर्थिक लखोटा |
| ३. | --- | ई—निविदा तपशिल तयार करणेसाठी कालावधी | २०.०४.२०१७ वेळ १०.०० | ०४.०५.२०१७ वेळ १७.३० | वरील प्रमाणे |
| ४. | तांत्रिक लखोटा बंद करणे | --- | ०४.०५.२०१७ वेळ १७.३१ | ०५.०५.२०१७ वेळ १७.४५ | वरील प्रमाणे |
| ५. | आर्थिक लखोटा बंद करणे | --- | ०४.०५.२०१७ वेळ १७.३१ | ०५.०५.२०१७ वेळ १७.४५ | वरील प्रमाणे |
| ६. | --- | ई—निविदा ऑनलाईन सादर करणे | ०५.०५.२०१७ वेळ १७.४६ | ०८.०५.२०१७ वेळ ९.५९ | वरील प्रमाणे |
| ७. | तांत्रिक लखोटा उघडणे (शक्य झाल्यास) | --- | ०८.०५.२०१७ वेळ १०.०० | ०९.०५.२०१७ वेळ १७.४५ | तांत्रिक लखोटा |
| ८. | आर्थिक लखोटा उघडणे (शक्य झाल्यास) | --- | ०८.०५.२०१७ वेळ १०.०० | ०९.०५.२०१७ वेळ १७.४५ | आर्थिक लखोटा |

टिप: तांत्रिक व आर्थीक देकार उघडणे संदर्भातील दिनांकाबाबतची चौकशी कृपया विद्यापीठ अभियंता, डॉ.बा.सा.कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी (फोन नं. ०२३५८—२८२४११, १२, १३) कार्यालयास करण्यात यावी.

विद्यापीठ अभियंता

# सर्वसाधारण अटी व शर्ती

१. खालील प्रमाणे ठेकेदारांनी ई—निविदेची कागदपत्रे शासकीय संकेतस्थळावर अपलोड करावीत.
   १. अधिकृत उत्पादक, अधिकृत पुरवठादार किंवा अधिकृत विक्रेते यांचे प्रमाणपत्र.
   २. ठेकेदाराचे नांव/संस्थेचे नांव शासनाचे तसेच अन्य कोणत्याही संस्थेकडे काळ्या यादीत नसल्याबाबतचे नोटरी समक्ष रु. १००/—मात्रचे कोर्ट फी स्टॅम्प वरील **स्वतंत्र** शपथपत्र. (निविदा प्रसिध्द् केल्याच्या एक वर्ष आतील कालावधीचे)
   ३. व्हॅट प्रमाणपत्र.
   ४. मागील वर्षातील आयकर प्रमाणपत्र. (वर्षे २०१६—१७)
   ५. ऑनलाईन सादर केलेली कागदपत्रे खरी असल्याचे १००/— बॉन्ड पेपरवरील **स्वतंत्र** प्रतिज्ञापत्र.

२. **शासकीय धोरणान्वये ई—निविदेची कागदपत्रे ही ऑनलाईन सादर करावयाची असल्याने ई—निविदा करीता सादर करावयाची कागदपत्रे कार्यालयात लखोट्यामध्ये पुनःश्च सादर करण्याची आवश्यकता नाही.**

३. तांत्रिक लखोट्यामधील कागदपत्रांच्या पूर्ततेबाबत आवश्यकता भासल्यास प्रत्यक्ष **मुळ** कागदपत्रांची पहाणी करणेत येईल. तांत्रिक लखोट्यामधील कागदपत्रांची सत्यता व अन्य तपासणी असमाधानकारक आढळणाऱ्या निविदाधारकांना त्याबाबत कोणत्याही प्रकारे स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही.

४. सदर पुरवठादारांनी सादर केलेल्या निविदेचा तुलनात्मक तक्ता हा निविदाधारकांनी सादर केलेल्या एकुण रक्कमेवर करण्यात येईल.

५. सदर कामाची ई—निविदा फॉर्म फी निविदा फॉर्म डाऊनलोड करणेपूर्वी ऑनलाईन पध्द्तीने जमा करावी लागेल तसेच इसारा रक्कम देखील ऑनलाईन पध्द्तीने जमा करावयाची आहे. ठेकेदाराने सर्व रक्कमा या ऑनलाईन पध्द्तीने जमा करावयाच्या आहेत. **ई—निविदा फॉर्म फी/इसारा रक्कम/सुरक्षा अनामत रक्कम जमा करणेमधुन कोणत्याही प्रकारची सूट अथवा सवलत मिळणार नाही.** तसेच सदर बाबत कोणत्याही प्रकारची रक्कम ही प्रत्यक्षात विद्यापीठाच्या कोणत्याही खात्यामध्ये बॅंकेव्दारे जमा करावयाची नाही. म्हणजेच सर्व व्यवहार हा डेबीट किंवा क्रेडिट कार्ड व्दारेच करावयाचा आहे. बॅंक कमीशन किंवा बॅंकेचे इतर चार्जेस वजा जाता या कार्यालयाची निविदेची बयाणा आणि निविदा संचाची किंमत येणे आवश्यक आहे.

६. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाउनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई—निविदा प्रणालीचे मुख्य संकेतस्थळ **maharashtraetenders.in** किंवा **adf.maharashtra.etenders.in** येथे नोंदणी करणे आवश्यक आहे. निविदा प्रक्रीयेत सहभागी होणाऱ्या ठेकेदारांना ऑनलाईन निविदा तयार करण्यासाठी **रु. १०६३/—** प्रति निविदा ऑनलाईन जमा करावे लागतील. सदरहू रक्कम ठेकेदाराने ई—निविदा Decryption/Re-encryption करणेचे कालावधीमध्ये ऑनलाईन जमा करणे आवश्यक आहे.

७. खालील निर्देशित केलेल्या शासकीय करांची कंत्राटदाराच्या देयकामधून वेळोवेळी कपात केली जाईल.

| | | |
|---|---|---|
| **a) VAT** | - | **2.00 %** |
| **b) Income tax** | - | **As per rates fixed by Income Tax Department, Govt. of India** |

८. वरील कामाची सविस्तर ई—निविदा सुचना वेळापत्रकानुसार विद्यापीठाच्या **www.dbskkv.org / maharashtraetenders.in / adf.maharashtra.etenders.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

९. निविदाकारांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन सादरीकरण करणे संदर्भात व डिजिटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी पुढील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा —

Sify Techonoligies Ltd., Nextender (India) Pvt. Ltd. (020) 25315555

Email:-support.gom@nextenders.com

१०. निविदा उघडण्याच्या तारखेला सुट्टी जाहीर झाली असल्यास त्या दिवसाचे कामकाज लगतच्या पुढील कामकाजाच्या दिवशी पार पाडणेत येईल.

ज्या निविदाकारांची कागदपत्रे खोटी आढळुन येतील अशा निविदाकाराची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल.

१२. इतर अटी व शर्ती ई–निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणत्याही स्तरावर नामंजूर करण्याचा हक्क निम्नस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवलेला आहे.

१३. निविदेमधील कामे ही कालमर्यादित असल्याने कार्यादेश दिल्यापासून सदरची कामे विहीत मुदतीमध्ये पूर्ण करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

१४. निविदेमधील नमुद केलेले काम कमी/जास्त होण्याची शक्यता आहे किंवा संपुर्ण किंवा एखादे साहित्य कमी करणेत येईल. प्रत्यक्षात केलेल्या कामाचेच देयक अदा केले जाईल.

१५. आदेशित केलेले काम पुर्ण झाल्याशिवाय कोणत्याही प्रकारचे पेमेंन्ट अदा केले जाणार नाही.

१६. पुरवठा धारकाने निविदेमध्ये सर्व दर समाविष्ट करुन तसेच दापोली येथे पोहोच यासह सर्व खर्च समाविष्ट असेल. (उदा. टॅक्स, वॅट, ड्युटी, ने–आण पॅकींग) दराची निविदा भरावी.

१७. पुरवठादाराने पुरवठा केलेल्या मालाचा/यंत्रांचा पुरवठा दिलेल्या स्पेसिफिकेशन प्रमाणे करणे बंधनकारक आहे.

१८. सदर साहित्याची दोन वर्षे मुदतीची ऑन साईट वॉरंटी देणे बंधनकारक राहिल. तसे रु.१००/– मात्र स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र नोटराईज करुन देणे बंधनकारक राहिल.

१९. शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निविदा अंतिम करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचेकडे रहातील.

२०. अधिक माहितीसाठी विद्यापीठ अभियंता, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचेकडे कामाचे दिवशी कार्यालयीन वेळेत निविदाकारास संपर्क साधता येईल.

विद्यापीठ अभियंता,
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण
कृषि विद्यापीठ, दापोली

**प्रत विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्यांना माहितीसाठी सविनय सादर**

प्रत, माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी –

१. मा. कुलगुरू महोदय यांचे स्विय सहाय्यक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना माहितीसाठी सविनय सादर
२. मा. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण परिषद, सर्व्हे नं. १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर
   २/– यांना कळविण्यात येते की, प्रस्तावित निविदा उघडण्याच्या तारखेला कृपया आपला प्रतिनिधी पाठवावे हि विनंती.
३. शिक्षण संचालक, डॉ बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली
४. संशोधन संचालक, डॉ बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली
५. संचालक विस्तार शिक्षण, डॉ बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली
६. नियंत्रक, डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
७. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना कळविण्यात येते की सदरची निविदा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द् करण्यात यावी.
८. संबंधीत सहाय्यक अभियंता/शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता/आरेखक, डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
९. नोटीस बोर्ड, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली